# ठाणे महानगरपालिका ठाणे

नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक - २३/२/२०११

मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
सभा सुचना क्रमांक ९ दिनांक १७/२/२०११
सभा क्रमांक १ दिनांक २३/२/२०११

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक २३/२/२०११ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता मा.नौपाडा प्रभाग समिती कार्यालय येथील ''कै.मो.दा.जोशी सभागृह'' येथे सभा सुचना क्रमांक ०९ दिनांक १७/२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे हया उपस्थित होत्या.

## सभेस उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे | अध्यक्षा |
| २. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ३. | सौ.सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ४. | श्री.संजय संतू वाघुले | सदस्य |
| ५. | श्री.मुकुंद रामचंद्र जाधव | स्वीकृत सदस्य |
| ६. | श्री.प्रकाश धोंडू पायरे | स्वीकृत सदस्य |
| ७. | श्री.पुंडलिक मारुती थोरवे | स्वीकृत सदस्य |

## सभेस गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| २. | सौ.अनिता हिराकांत फर्डे | सदस्या |
| ३. | श्री.महादिप उर्फ मुन्ना बिष्ट | सदस्य |
| ४. | श्री.अशोक बारकू वैती | सदस्य |
| ५. | श्री.विलास शिवराम सामंत | सदस्य |
| ६. | सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्या |

**श्री.दिनकर शिंदे, प्रभाग अधिकारी**

(विषयपत्रिका वाचून दाखवितात )

**श्री.संजय वाघुले**

मा.अध्यक्षा महोदया, आजच्या सभेमध्ये शहर विकास विभागाकडील अधिकारी हजर असतील तर त्यांनी आपली ओळख दाखवावी.

**श्री.महेश अमृते, शहर विकास अधिकारी**

मा.अध्यक्षा महोदया, मी शहर विकास विभागाकडुन हजर असुन माझे नांव श्री.महेश अमृते आहे.

**श्री.संजय वाघुले**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये जे काही ठिकाणी इमारतीचे बांधकामे चालू असुन त्याबाबत विकास प्रस्ताव मंजुरीचे विकासकांनी फलक सुचनांचे बोर्ड लावलेले दिसुन येत नाहीत आहेत त्याची काही माहिती या बैठकीमध्ये मिळू शकेल का ?

**श्री महेश अमृते, शहर विकास अधिकारी**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये ज्या इमारतीचे बांधकामाना विकास प्रस्ताव अंतर्गत मंजूरी मिळालेली असुन सुध्दा विकासकांनी फलक सुचना लावले नसल्यास त्यानुसार फलक सुचना लावणेबाबत संबधिताना लेखी सुचना दिल्या जातील.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, ज्या विकासकांनी माहिती फलक लावले नाही आहेत त्यांचेवर काय कार्यवाही करण्यात येणार आहे.

**श्री.महेश अमृते, शहर विकास अधिकारी,**

मा.अध्यक्षा महोदया, त्या अनुषंगाने संबधित ठिकाणी पाहणी करुन बोर्ड लावले नसल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, औरंगाबाद महानगरपालिकेकडुन संबधित इमारतीच्या ठिकाणी विकासकांना फलक सुचना लावणेबाबत बंधनकारक केलेले आहे. त्यांमुळे सदर इमारतीचे बांधकाम अधिकृत आहे की अनधिकृत आहे याची माहिती मिळू शकते. औरंगाबाद महानगरपालिकेने केलेला उपक्रम हा चांगला आहे. ठाणे महानगरपालिकेकडुन सुध्दा असा उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

**श्री.महेश अमृते, शहर विकास अधिकारी,**

मा.अध्यक्षा महोदया, हया अनुषंगाने वरिष्ठांशी चर्चा करण्यात येईल.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती कडुन मागासवर्गीय निधी अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन व पाणी पुरवठा विभागाकडुन किती कामे चालु आहेत त्याची माहिती देण्यांत यावी.

**श्री.नितीन पवार,**

मा.अध्यक्षा महोदया, मागासवर्गीय निधी अंतर्गत कामे बहुतेक ठिकाणी चालू आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाकडुन कामे सुरु करणेयात आलेली आहेत.

**श्री.गवळी, पाणीपुरवठा विभाग**

मा.अध्यक्षा महोदया, पाणीपुरवठा विभागाकडुन कामे देण्यात आलेली आहेत.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, मागासवर्गीय निधी लॅप्स होतो कां

**श्री.नितीन पवार,**

मा.अध्यक्षा महोदया, मागासवर्गीय निधी लॅप्स होत नाही

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत तीन मैदाने असुन त्यामध्ये मुलांना खेळण्यासाठी मैदान शिल्लक राहिलेले नाहीत. भगवती शाळेच्या समोरील मैदान फक्त शाळेतील मुलांना मैदान खेळण्यासाठीच असुन बाकी शिवाजी मैदान, गांवदेवी मैदान व घंटाळी मैदान खेळण्यासाठी जागा राहिलेली नाही. घंटाळी मैदान हे तेथील एका संस्थेकडे दिलेले असुन तेथे कार्यक्रम करावयाचे असल्यास त्या संस्थेकडे जावे लागते. जर गांवदैवी मैदान व शिवाजी मैदान येथे महिला बचत गटांना व्यावसायिक स्वरुपाचे स्टॉल लावण्यांस दिल्यास त्यांना रोजगार मिळू शकेल व त्यांना रोजगाराच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळु शकेल.

**श्री.प्रकाश पायरे,**

मा.अध्यक्षा महोदया मैदानाबाबत सविस्तर माहिती स्थावर मालमत्ता विभागाकडील अधिकारी आहेत त्यांनी द्यावी. तसेच भगवती मैदानाबाबतही माहिती देण्यांत यावी.

**श्री.खानापूरकर, स्थावर मालमत्ता अधिकारी**

मा.अध्यक्षा महोदया मी स्थावर मालमत्ता विभागाकडे बदली होऊन दोन दिवस झालेले आहेत. आमच्या विभागाकडील श्री.महाकाळ साहेब यांच्याकडुन माहिती घेउन पुढच्या बैठकीमध्ये सविस्तर माहिती देतो.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, मैदाने भाडयाने घेण्याबाबत काही अर्ज आलेले आहेत कां

**मा.अध्यक्षा,**

मा.अध्यक्षा महोदया, याबाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी

**श्री.मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत एकूण ३ मैदाने असुन घंटाळी मैदान, गांवदेवी मैदान, शिवाजी मैदान उपलब्ध आहेत. शिवाजी मैदान हे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय कार्यक्रमांसाठी देण्यात येते. बाकी उर्वरित २ मैदाने कुठल्याही प्रकारचे मैदान देता येईल. महिला बचत गटांना सुध्दा मैदान भाडे देउन जास्तीत जास्त फायदा करुन देण्यांत येऊ शकतो. शिवाजी मैदान हे महिला बचत गटांना वस्तु विक्री करण्यासाठी देण्यांस हरकत नाही. परंतु शिवाजी मैदान हे खेळण्यासाठी राहिलेले नाही आहे. गांवदेवी मैदान सुध्दा खेळण्यासाठी राहिलेले नाही. भगवती मैदान हे मुलांना खेळण्यासाठी होउ शकते. माझी अशी सुचना आहे की, भगवती व गांवदेवी ही दोन्ही मैदाने येथे कुठल्याही प्रकारचे वाणिज्य वापरासाठी होउ शकत नाही. परंतु छत्रपति शिवाजी मैदान हे वाणिज्य वापरासाठी करता येउ शकेल.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, टेंभी नाक्यावर ज्या वेळेला देवीचा नवरात्र उत्सव होत असतो त्या वेळेस शिवाजी मैदानाचा वापर वेगळया कारणसाठी होत असतो. याबाबत मला वेगळे असे सांगावयाचे नाही परंतु अशा त-हेने वापर करणे चुकीचे आहे.

**श्री.मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त,**

मा.अध्यक्षा महोदया, महिला बचत गटां मार्फत जो काही कार्यक्रम होईल त्याबाबत आमचा नकार नाही. महिला बचत गटांनी मैदान भाडयाने घेउन तेथे विविध प्रकारचे स्टॉल लावावे व रोजगाराच्या दृष्टीने प्रयत्न करावा. पंरतु वस्तुस्थिती अशी आहे की, महिला बचत गटाच्या स्टॉलमध्ये काही खाजगी स्टॉल लावले जातात ही बाब योग्य नाही. त्यामध्ये खरोखरच महिला बचत गटांनाच स्थान मिळालेच पाहिजे असे वाटते. त्याचबरोबर तिन्ही मैदानाचा जर कमर्शियल वापरासाठी वापर करण्यांत यावा

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, छत्रपति शिवाजी मैदान हे मैदान वाणिज्य वापरासाठी देण्यांत यावे. या मैदानावरील स्टॉलमधुन जो काही निधी मिळेल तो इतरत्र तिन्ही मैदानासाठी वापरण्यांत यावा.

**सौ.सुजाता पाटील,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती कार्यालयामधील टॅक्स मध्ये जो जुना रेकॉर्ड आहे. त्याचप्रमाणे पाण्याचे बिलाचा सुध्दा जुना रेकॉर्ड होतो कां टॅक्समध्ये पाण्याची बिले जुना रेकॉर्ड मार्फत मिळतो त्याचे ऑडिट होते का

**श्री.मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त,**

मा.अध्यक्षा महोदया, टॅक्स बिलाचे जे ऑडिट केले जाते तसेच पाण्याचे बिलाचे ऑडिट केले जाते. आपणांस याबाबत कोणत्याही वर्षीचा रेकॉर्ड हवा असल्यास आपणांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सौ.सुजाता पाटील,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समितीच्या बाजुला रस्त्याच्या दोन्ही साईडला ट्रफिक होत आहे. जो महापालिकेकडुन कार्यवाही करावी नो पार्किग बोर्ड लावावा

**श्री मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त**

मा.अध्यक्षा महोदया, ट्रॅफिक पोलिसांना पत्र दिलेले आहे त्यांचेकडुन रिप्लॉय मिळालेला नाही. महापालिकेकडुन जॅमर लावुन गाडया उचलण्यांत येत आहेत तसेच त्या ठिकाणी नो पार्किग चा बोर्ड लावण्यांत येईल.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, नुकतीच महापालिकेकडुन दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रांत पे ॲण्ड पे बाबत जी जाहीरात देण्यांत आलेली आहे. याबाबतची माहिती देण्यांत यावी. काही ठिकाणी यापुर्वी पे ॲण्ड पे ची व्यवस्था चालू केलेली होती परंतु ती बंद झालेली आहे. पे ॲण्ड पे पध्दत चालु केल्यास त्यापासुन महापालिकेला उत्पन्न मिळु शकेल.

**श्री.मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त,**

मा.अध्यक्षा महोदया, दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये जी बातमी आली आहे ती खरी आहे. याबाबत टेंडर मागविण्यांत येत आहेत. नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत पे ॲण्ड पे कोणत्या ठिकाणी करावायचे आहे ते नकाशे उपलब्ध झाल्यानंतर माहिति मिळु शकेल. अजुन नकाशे मिळालेले नाही आहेत.

**श्री.संजय वाघुले,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समितीकडील वृक्ष विभागाकडुन झाडाच्या फांदया तोडण्याची कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे यासाठी गाडी केव्हा उपलब्ध होणार आहे.

**श्री. ठोकळे, वृक्षप्राधिकरण विभाग**

मा.अध्यक्षा महोदया, सध्या गाडी उपलब्ध नाही आहे गाडी मिळाल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.मुकुंद जाधव,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे चालु आहेत त्या ठिकाणी दगडाचा भुसा वापरला जात आहे. भुसा वापरणेसाठी परवानगी कोणी दिली आहे का. रस्त्याचे काम होताना रेतीचा वापर कुठेच होत नाही आहे.

**श्री बहिरम, सा.बा विभाग**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे चालु आहेत त्या ठिकाणी दगडाचा भूसा वापरला जात नाही.

**श्री पायरे,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये काही ठिकाणी कचरा टाकू नये असे असतानाही काही ठिकाणी लोकांकडुन कचरा टाकला जात आहे. अशा लोकांवर काय कार्यवाही करण्यात येणार आहे. दुसरे असे की काही ठिकणी कचरा तीन तीन दिवस कचरा उचलला जात नाही.

**श्री.मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त,**

मा.अध्यक्षा महोदया, महापालिकेचे डंपीग ग्राऊंड उपलब्ध नसुन १० स्पॉट आहेत.

**श्री.पायरे,**

मा.अध्यक्षा महोदया, पे ॲण्ड पार्क कधी पासुन सुरु होणार आहे. नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये कुठे कुठे पे ॲण्ड पार्क योजना राबविण्यांत येणार आहे.

**श्री मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत मासुंदा तलाव, ठाणे स्टेशन, जांभळी नाका, मासुंदा तलाव तलावपाळी येथे होणार आहे. याबाबत मा.आयुक्तसो व्यक्तीशः पाहणी करणार आहेत.

**सौ.स्मिता देशमुख,**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये काही काही ठिकाणी रस्त्यामध्ये रस्ता खणून खडडे केलेले आहेत. ते त्वरीत खडडे बुजविण्यांत यावेत. तसेच खडडे खणतांना आजुबाजुला माती काढुन टाकलेली आहे त्यांमुळे आजुबाजुला धुळीचे वातावरण निर्माण झालेले आहे. सदरचे काम अजुन किती दिवस चालणार आहे.

**श्री.बहिरम, सा.बा. विभाग**

मा.अध्यक्षा महोदया, पाहणी करुन सदरचे खडडे त्वरीत बुजविण्याबाबत कळवितो.